


**परभणी;** जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना आरोग्यवर्धक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी स्वाती सुर्यवंशी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, गजानन इनामदार, डॉ. तुषार सुकळीकर, डॉ. दिपक करजगीकर, मितेश शहा व इतर

# कर्मचाऱ्यांना रोगप्रतिकार शक्ती वर्धक गोळ्यांचे वाटप

**परभणी** ▪ शहर प्रतिनिधी

श्री विश्ववती आयुर्वेद चिकित्सालय कोल्हापुर व क्विक हिल फाउंडेशन यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना रसमाधव या रोगप्रतिकार शक्ती वर्धक गोळयांचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाधिकारी स्वाती सुर्यवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, गजानन इनामदार, डॉ. तुषार सुकळीकर, डॉ. दिपक करजगीकर, मितेश शहा यांची उपस्थिती होती. श्री विश्ववती आयुर्वेद संशोधन केंद्र कोल्हापुर यांच्यावतीने संशोधीत करण्यात आलेल्या रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी रस माधव व माधव रसायन या औषधांची निर्मिती करण्यात आली आहे. आतापर्यंत रसमाधव वटी या औषधांचे संपूर्ण महाराष्ट्रात१लाखाहून अधिक कोविड वॉरियर्सना वाटप करण्यातआले आसून त्याचा खुप सकारात्मक परिणाम दिसून आला आहे असे म्हटले आहे.